# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (शिक्षण विभाग)

## सर्व शिक्षा अभियान

क्र.शि.वि / सशिअ / 2013–14 / 874 दिनांक – 08/01/2014

कालमर्यादित / तात्काळ

प्रति

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

..............................................

मनपा, नागपूर

विषय :– सर्व शिक्षा अभियान योजनेतंर्गत बांधकाम निहाय झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणेबाबत

संदर्भ :– या कार्यालयाचे पत्र क.शिवि / सशिअ / 2013.14 / 512 दि. 9.7.2013

उपरोक्त संर्दभिय पत्राचे अवलोकन करावे.

सर्व शिक्षा अभियान योजनेतंर्गत सन 2001.2002 ते सन 2012.13 पर्यत आपल्या शाळांना विविध बांधकामाबाबत जसे. नविन शाळा बांधकाम, शहर साधन केंद, समूह साधन केंद्र, अतिरिक्त वर्ग खोली बांधकाम, इमारत विरहित, धोकादायक वर्गखोली, मुलांचे स्वच्छतागृह मुलींचे स्वच्छतागृह, पिण्याचे पाण्याची व्यवस्था, संरक्षण भिंत बांधकाम इ. बांधकामाबाबत मनपा सशिअ कार्यालया मार्फत अनुदान वितरित करण्यात आले आहे. व बांधकामे पुर्ण झाली असल्यास झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र बांधकामाचे फोटोग्राफ सह या कार्यालयास पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि अद्यापही ब–याच मुख्याध्यापका कडून उपयोगिता प्रमाणपत्राची माहिती विहित नमून्यात बांधकामनिहाय या कार्यालयास अप्राप्त आहे.

सबब आपणास सूचित करण्यात येते की ज्या शाळांनी अद्यापही उपयोगिता प्रमाणपत्राची माहिती सादर केली नसल्यास 7 दिवसाचे आंत सदर माहिती या कार्यालयास सादर करावी.

अन्यथा सर्व शिक्षा अभियान योजनेच्या निधीचा संशयीत अपहार / गैरव्यवहार झाला आहे असे समजून संबंधित मुख्याध्यापका विरूद्ध फौजदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी

महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :– माहितीस्तव सविनय सादर

1. मा. राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप, मुंबई.
2. मा. आयुक्त महानगरपालिका, नागपूर
3. मा. अपर आयुक्त महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाधिकारी
महानगरपालिका, नागपूर